जन्म-मृत्यू नोंदणीचे अभिलेख जतन करण्यासाठी ३०४ स्टील कपाटांची खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः खरेदी-२०१७/प्र.क्र. १५६/आरोग्य-८
नविन मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय कंपांउंड,
कॉम्पलेक्स बिल्डींग, १० वा मजला, मुंबई ४००००१
दिनांक: १० ऑक्टोंबर, २०१७

संदर्भ-

१) सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक संआसे/खरेदी कक्ष/टे-५/स्टिल कपाट/११३०/आमाजिआ, दिनांक १९.०५.२०१७
२) उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजिआ), पुणे यांचे पत्र क्रमांक आमाजिआ/कक्ष ८५ड/ भांडार/ स्टिल कपाट खरेदी/३९९६-३९९८/१७,दिनांक २५.०४.२०१७ व दिनांक १८.०७.२०१७

प्रस्तावना -

उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजिया), पुणे हे कार्यालय सांख्यिकी विभाग, जन्म-मृत्यू नोंदणी व विवाह नोंदणीचे राज्यस्तरीय कार्यालय आहे. सदरहू कार्यालयांतर्गत जन्म-मृत्यू नोंदणी कामकाजासंदर्भात पर्यवेक्षण व संनियंत्रण करण्यात येते. भारत सरकारच्या सन १९६९ च्या तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २००० च्या जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियमातील तरतुदीनुसार जन्म-मृत्यू नोंदणी माहितीचे अभिलेख कायमस्वरुपी जतन करणे व सुस्थितीत ठेवणे बंधनकारक आहे. सदरहू अभिलेख जतन करुन ठेवण्यासाठी राज्यातील पंचायत समिती व जिल्हा परिषद कार्यालयांकडून ३०४ स्टील कपाटांची मागणी करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने ३०४ स्टील कपाटांची खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत संदर्भीय पत्रान्वये प्रस्ताव प्राप्त झाला आहे. त्यानुसार स्टील कपाट खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

आरोग्य सेवा संचालनालयाने संदर्भीय दिनांक १९.०५.२०१७ च्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने जन्म-मृत्यू नोंदणीचे अभिलेख जतन करण्यासाठी राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती कार्यालयातील सांख्यिकी विभागाकरिता ३०४ स्टील कपाटांची (अंदाजित रक्कम रुपये ४२,५६,०००/-) खरेदी करण्यासाठी निविदा प्रक्रिया करण्यास खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

१) स्टील कपाटांची आवश्यकता/मागणी याची शहानिशा/खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.
२) सदर कपाटांचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती/अधिकारी यांनी) मान्य केलेल्या विनिर्देशानूसार असावेत. तसेच सदर तांत्रिक विनिर्देश (Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच या बाबींची खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस २०१४/प्र.क्र.८२/भाग-III /उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतुदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती निश्चित करण्यात आलेला दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खाजरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व/ पुरवठानंतर नमुना तपासणी (Pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदर खरेदीवरील रुपये २७,५८,०००/- इतका खर्च "२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य- पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना - (०१) (०२) जीवनविषयक आकडेवारी माहिती केंद्राचा दर्जा वाढविणे - २१ पुरवठा व सामग्री (२२१० १०९१)" या लेखाशिर्षांअंतर्गत व रुपये १४,९८,०००/- इतका खर्च " ४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च- राज्य योजनांतर्गत योजना (दत्तमत)-(०१) (०१) जीवनविषयक आकडेवारी माहिती केंद्राचे बळकटीकरण- ५२, यंत्रसामग्री व साधनसामग्री (४२१० १२६२)" या लेखाशिर्षांअंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

८) तसेच सदर साहित्य खरेदीची द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

९) संपुर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelince) तंतोतंत पालन करण्यात यावे.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८,भाग-पहिला, उपविभाग-दोन मधील अ.क्र.४, नियम क्रमांक ७ समोरील स्तंभ क्रमांक ६ येथील अटींची पुर्तता करण्यात यावी.

११) खरेदी प्रक्रिया पुर्ण झाल्यांनतर केंद्रीय खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करण्यात यावेत.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते ११ येथे नमूद अटींची पुर्तता करण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत कार्यक्रम प्रमुख यांची तसेच आरोग्य सेवा संचालनालयाची राहील.

२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग दोन मधील अ.क्र.४, नियम क्र. ७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार सदरहू प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१०१५३११४३६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2017.10.10 17:27:06 +05'30'

(व.मुं.भरोसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
३) सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
४) सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) , आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
५) उपसंचालक, आरोग्य सेवा (आमाजिआ), पुणे
६) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई
७) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), नागपूर
८) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
११) निवडनस्ती (आरोग्य-८)